# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २६३/२०२४ दिनांक:- १६/०७/२०२४.

## "गुरे चोरण्या करीता चार चाकी वाहन चोरी करणा-या आरोपीला ताब्यात घेवुन गुन्हे उघडकीस आणण्यात गुन्हे शाखा कक्ष-३ विरार यांना यश"

दिनांक १३/०६/२०२४ रोजी रात्रौ १०.३० वा. ते दि. १४/०६/२०२४ रोजी ०७.०० वा.च्या दरम्यान जि. पालघर, ता. वसई, सकवार, वरठापाडा घर क्रमांक ४७७ च्या आवारात पार्क केलेली ३,००,०००/- रुपये किंमतीची एक सफेद रंगाची ईको कार तिचा रजिस्ट्रेशन क्रमांक MH48BT7410 हि फिर्यादी यांचे संमती शिवाय अज्ञात आरोपीत यांनी लबाडीच्या इरादयाने स्वत:चे फायदया करीता उघडया जागेवरुन चोरी करुन नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन मांडवी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर १६५/२०२४, भादंविस कलम ३७९ प्रमाणे. गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हे अनुषंगाने पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपासादरम्यान घटनास्थळावरील उपलब्ध सि.सि.टी.व्ही. फुटेज मध्ये संशयीत आरोपीत निष्पन्न करुन तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या गोपणीय बातमीवरुन आरोपी नामे-अरबाज अतिक मिसाळ वय-२४ वर्षे, रा. आलोबा चाळ, वाजा मोहल्ला, नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जि. पालघर. यास दिनांक १५/०७/२०२४ रोजी सदर गुन्हयातील चोरी केलेल्या ३,००,०००/- रुपये किमतीच्या ईको कार सह ताब्यात घेण्यात आले आहे. त्याचेकडे प्राथमिक तपास करता खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | **मांडवी पोलीस ठाणे** | १६५/२०२४, भादंविस कलम ३७९, ३४ प्रमाणे |
| २ | **नालासोपारा पोलीस ठाणे** | १९४/२०२४ भादंविस कलम १७९ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ११ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १(ए), ५ (ब) प्रमाणे. |

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी याचा गुन्हेगारी पुर्वाभिलेख पडताळुन पाहता त्याचे वाहन चोरी व गुरे चोरी सारखे खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहे.

**आरोपी नामे - अरबाज अतिक मिसाळ याचा गुन्हेगारी पुर्वाभिलेख खालील प्रमाणे**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | **नालासोपारा पोलीस ठाणे** | ४४७/२०२३ भादंविस कलम ३७९,३४ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ११ (१), (ग),(ड),(क) प्रमाणे |
| २ | **वालीव पोलीस ठाणे** | १३२२/२०२३ भादंविस कलम ३७९, ३४ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ३ | **वालीव पोलीस ठाणे** | ३९२/२०२३ भादंविस कलम ३७९, ४२९,३४ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ११ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ११,४७,४८,५१,५४,५६ प्रमाणे |
| ४ | **डहाणु पोलीस ठाणे (पालघर)** | १२३/२०२३ भादंविस कलम ३८२, ४६७, ४६८,४७०,४२९,४२७ प्रमाणे |

उक्त आरोपी यास पुढील कारवाई करीता मांडवी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १६५/२०२४, भादंविसं कलम ३७९, ३४ प्रमाणे या गुन्हयात हजर करण्यात आले आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पांडेय, पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली, निरीक्षक/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोहवा/अशोक पाटील, मनोज चव्हाण,सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, मनोज तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, म.सु.ब/प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

-----------oooooo------------

